शीर्षक : कावळा, सायकल, आणि मी !

एके दिवशी मी शाळेतून घरी आल्यावर वाटलं की आज अभ्यास नकोच करायला. आज काहीतरी मजेशीर गोष्ट करूयात. "काय करायचं बरं ?" असा विचार सुरू झाला. मग तेवढ्यात एक कल्पना माझ्या मनाला शिवून गेली. मी क्षणाचाही विलंब न करता हात, पाय, तोंड धुतले, कपडे बदलून खाली सायकल काढायला ~~गेले~~ पळाले. अनन्या, कस्तुरी, कनिष्का हा आयता प्रेक्षकवर्ग बघून मला भलताच हुरूप आला. मी घाईघाईनी सायकल वर टांग मारली आणि आमचा रथ भरधाव निघाला. अनन्याकडे कटाक्ष टाकून तिला सांगितले "मोज माझ्या फेऱ्या."

हा माझा आनंद एका कावळ्याला फार काळ ~~ब~~ बघवला नसावा. दुसरी फेरी संपवत असतानाच एक काक महाराज माझ्या छातीवर येऊन धाडकन आपटले. फडफड करत उडून जाण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या या कावळ्याचा उजवा पाय अडकला माझ्या ड्रेसच्या नक्षीकामात.

या सगळ्या गडबडीत मी सायकलवरचे हात दिले सोडून. दोघांपैकी कोण जास्त घाबरलं होतं - कावळा का मी - हे सांगणं अवघडच होतं. आमच्या भरकटलेल्या सायकलचे तारू निघाले सोसायटीतल्या एका उंच झाडाच्या दिशेने. नुकत्याच झालेल्या पावसामुळे झाडाखाली अनायसेच तळं साचलं होतं. पुढच्या क्षणी तीन घटना घडल्या : कावळ्यानी आपली सुटका करून घेतली आणि तो उडून गेला, आमच्या सायकलची वरात पाण्यात शिरली, व आमची स्वारी धप्पदिशी त्या पाण्यात जाऊन कोसळली !

मी जेव्हा उठले तेव्हा माझ्या केसांत पानांची महिरप तयार झाली होती, शिवाय ड्रेसवर चिखलाची रांगोळी तयार झाली होती. याच बरोबर खिदळणारा प्रेक्षकवृंद होताच ! रडक्या चेहऱ्यानी आणि दुखऱ्या पायांनी मी कशीबशी घरी पळाले.

आता तर मी कानाला खडाच लावून घेतला होता. सायकल चालवायची असेल तर ती आजूबाजूला कोणी नसताना. आणि आकाशात जर कावळे उडत असतील तर ? मग तर नकोच रे बाबा ! ☺

विद्यार्थ्याचे नाव : सायली दर्प

शाळेचे नाव : पी. आय. सी. टी. मॉडेल स्कूल

संपर्क क्रमांक : ~~९८२२~~ ९८२२२४७९०६

गट : ब (इयत्ता आठवी)